मुंबई दि. १६ मे २०१६

**महसूल विभागाच्या जमिनीच्या बदल्यात लाच मागितल्याचे कथित प्रकरण :**
**निराधार आरोप करणाऱ्यांवर अब्रु नुकसानीचा दावा दाखल करणार**
**---मंत्री एकनाथराव खडसे**

**मुंबई दि. १६ मे** – महसूल विभागाच्या जमिनीच्या बदल्यात गजानन पाटील या व्यक्तीने ३० कोटी रुपयांची कथित लाच मागितल्या प्रकरणी माझ्यावर निराधार आरोप करणाऱ्या व्यक्तींवर मी अब्रु नुकसानीचा दावा दाखल करणार आहे. कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी स्वत: पुढाकार घेणार आहे. मी स्वत: चौकशीची मागणी यापूर्वीच केली आहे. सीबीआयच काय, पण अन्य कोणत्याही मोठ्या यंत्रणेमार्फत या प्रकरणाची चौकशी केली गेल्यास त्यासाठीही आपली तयारी आहे. या प्रकरणाचा संपूर्णपणे छडा लावल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज मुंबई येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. जाधव यांनी लेखी पत्राद्वारे संचालक, नगर रचना तसेच मंत्रालयातील नगरविकास विभाग, महानगर आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत, असे स्पष्ट करुन खडसे यांनी सांगितले की, एवढ्यावरच न थांबता जाधव यांनी फेब्रुवारी २०१३ मध्ये या जमिनीसंदर्भात दिल्ली येथील नॅशनल कमिशन फॉर शेड्यूल कास्ट च्या अध्यक्षांना निवेदन देऊन नांदीवली येथील मागणी केलेल्या जमिनीसंदर्भात शासनाविरुध्द जातीयवाद, वंशवाद व भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. याबाबत कमिशन ने राज्य शासनाशी पुन्हा पत्र व्यवहार केलेला नाही. जाधव यांनी नगरविकास विभाग, तत्कालीन महसूल सचिव स्वाधीन क्षत्रिय, नगरविकास सचिव मनुकुमार श्रीवास्तव हे जातीयवादी अधिकारी असल्याने निर्णय घेण्यात दिरंगाई करुन बळी घेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मंत्रालयातील उपसचिव घरत यांचेविरुध्द सुध्दा त्यांनी पैसे मागीतल्याबाबत जाधव यांनी तक्रार दाखल केली आहे. एवढ्यावरच न थांबता अर्जदाराने सार्वजनिक हिताची याचिका दाखल करणारा अर्जदार त्यावर निर्णय देणारे न्यायाधीश, अर्जदाराला मदत करण्यासाठी दिलेले सरकारी वकील (ॲमीकस क्युरी) या सर्वांवर देखील अर्जदाराने ते भ्रष्ट आहेत असे लेखी आरोप केले आहेत. मंत्रालयातील तत्कालीन परिवहन सचिव डॉ.शैलेशकुमार शर्मा, तत्कालीन प्रधान सचिव महसूल प्रविण परदेशी, तत्कालीन प्रधान सचिव नगरविकास मनूकुमार श्रीवास्तव, परिवहन आयुक्त सहस्त्रबुध्दे, एम.एम.आर.डी.ए. चे संपतकुमार यांनी बैठकीमध्ये सदर जमीन परिवहन विभागाला देण्याबाबत घेतलेला निर्णय अर्जदारावर अन्यायकारक असून यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे, असाही अर्जदाराचा आरोप आहे.

मंत्री खडसे पुढे म्हणाले की, गजानन पाटील ही व्यक्ती माझ्या मतदार संघातील आहे. तो वारकरी असल्यामुळे आषाढी वारीच्या वेळेला वारीमध्ये तो अनेकवेळा आला आहे. त्यामुळे तो परिचित आहे.

या कथित लाच प्रकरणाची माहिती देताना खडसे यांनी या प्रकरणातील कालानुरुप असलेले टप्पे पत्रकारांना सांगितले. ते म्हणाले की, डॉ.आर.के.जाधव यांच्या इंटरनॅशनल सोसायटी फॉर एक्सलन्स इन प्रोजेक्ट्स मॅनेजमेंट ॲन्ड रीसर्च या संस्थेकरीता जाधव यांनी ठाणे जिल्ह्याच्या कल्याण तालुक्यातील मौजे निळजे येथील सर्व्हे नं. ६३ पैकी १० हेक्टर ७८ आर. ही जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी मिळावी म्हणून २० ऑगस्ट २०११ रोजी अर्ज केला होता. या जागेची सरकारी किंमत ५ कोटी, ५३ लाख रुपये एवढी होती. ही जमीन गायरान संवर्गातील असल्याने ती त्यांना मंजूर करता येणार नाही, असे १२ सप्टेंबर २०१२ रोजी त्यांना कळविले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १२ जुलै२०११ रोजीच्या गायरान जमिनी संदर्भातील शासन निर्णयाच्या अनुषंगाने संस्थेची विनंती फेटाळली होती. नांदीवली ग्रामपंचायतीने व ग्रामसभेने ना-हरकत दाखला मिळणेकामीची जाधव यांच्या संस्थेची विनंती फेटाळण्यात आली असल्याचे त्यांना कळविले होते. आरक्षणाबद्दलची वस्तुस्थिती देखील संचालक, नगर रचना यांच्या पत्रान्वये स्पष्ट केली होती. एम.एम.आर.डी.ए. यांनी २७ गावाची सुधारीत विकास योजना शासनाने अद्याप मान्य केली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

दि.२१ जून २०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीत संस्थेचे जागा मागण्यासंदर्भातील प्रकरण जळून नष्ट झाल्यामुळे या प्रकरणाची पुनर्बांधणी करुन १ सप्टेंबर २०१२ रोजी ते प्राप्त करुन घेण्यात आले. याच संस्थेने सामाजिक प्रकल्पाकरीता ठाणे जिल्ह्याच्या कल्याण तालुक्यातील नांदिवली येथील १२ हेक्टर ९५ आर. एवढ्या जमिनीची देखील मागणी केली होती. या जमिनीचे सन २०११ च्या शीघ्र सिध्द गणकानुसार ७७ लाख, ४० हजार रुपये एवढे मूल्यांकन होते. या जमिनी संदर्भात राज्य शासनामार्फत अंतिम मंजुरी मिळण्यापूर्वीच जाधव यांनी

१ फेब्रुवारी २०१३ च्या पत्रान्वये ७७ लाख, ४० हजार रकमेचा आगाऊ धनादेश अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या नांवे जमा केला होता. परंतु असा धनादेश स्विकारण्याची तरतूद नसल्याने तो त्यांना परत करण्यात आला होता. आज सदर जागा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत असून सन २०१६ च्या सरकारी मूल्यांकनानुसार या जमिनीचे मूल्यांकन १५ कोटी रुपये एवढे आहे.

खडसे यांनी असेही स्पष्ट केले की, मी विरोधी पक्ष नेता म्हणून संस्थेच्या विनंतीनुसार शासनामार्फत निर्णय घेण्यास दिरंगाई होत असल्याने तत्कालीन महसूल मंत्र्यांना २८ डिसेंबर २०१२ रोजी पत्र दिले होते. संस्थेच्या या प्रकरणाबाबत माझी भूमिका गुणवत्तेवर निर्णय घेणे, अशीच होती. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास विभाग आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अभिप्राय घेऊन तत्कालीन शासनाने २२ जून २०१३ रोजीच्या पत्रानुसार जाधव यांना प्रारुप विकास योजना मंजूर होईपर्यंत सदर प्रकरणी जमीन मंजूर करता येणार नाही, असे कळविले होते. त्यामुळे संस्थेची विनंती २८ जून २०१३ रोजी फेटाळण्यात आली होती. विशेष म्हणजे अर्जदाराची शासनमान्य शाळा नाही, विद्यार्थी नाहीत असे असतानाही त्यांनी शैक्षणिक प्रयोजनासाठी जागेची मागणी केली. व्यवस्थापन प्रशिक्षण शिकविणाऱ्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेत अर्जदार संचालक पदावर काम करणारा सुशिक्षित आणि उच्च विद्याविभुषीत आहे. त्यामुळे त्यांना जमिन मिळविण्याच्या प्रक्रीया माहित नसाव्यात, हे शक्य वाटत नाही.

दरम्यानच्या काळात मुंबई उच्च न्यायालयातील एका जनहित याचिकेवरील निर्णयानुसार नांदीवली येथील उपरोक्त जमीन राज्य शासनाच्या परिवहन विभागास अद्ययावत प्रशिक्षण केंद्र तयार करण्यासाठी मंजूर करण्यात आली व या जागेचा आगाऊ ताबा देखील त्यांना देण्यात आलेला आहे. यानंतरही जाधव यांच्या संस्थेने जागा मंजूर करण्याबाबत पुन्हा विनंती केली होती. तथापी, सदर जमीनीचा ताबा जनहित याचिकेच्या निर्णयाच्या अधीन राहून परिवहन विभागास देण्यात आल्यामुळे संस्थेची विनंती २७ एप्रिल २०१४ रोजीच्या पत्रामुळे पुन्हा एकदा फेटाळण्यात आली.

मंत्री खडसे यांनी असेही स्पष्ट केले आहे की, ऑक्टोबर २०१४ मध्ये झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात सत्तांतर होऊन मी मंत्री (महसूल) पदाचा कार्यभार स्विकारला. जाधव यांनी संस्थेच्या वतीने २४ नोव्हेंबर २०१४ रोजी अर्ज पाठवून वरील जागेच्या मागणीची विनंती फेटाळण्यात आल्याबाबतच्या २७ एप्रिल २०१४ रोजीच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मला विनंती केली. त्यानंतर सदर संस्थेचा अर्ज मी स्वत: पुर्नविलोकन अर्ज म्हणून सुनावणीस घेण्याचे निश्चित केले व सुनावणी घेण्यात आली. यावेळी संस्थेची बाजू ऐकून घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांना या प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती समजावून देण्यात आली. तसेच सार्वजनिक प्रयोजनासाठी परिवहन विभागास जागा मंजूर करण्याच्या बाबतीत खाजगी संस्थेच्या तुलनेने प्राधान्य असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच ही मंजूरी उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेच्या निर्णयानुसार देण्यात आली असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

संस्थेचा पुनर्विलोकन अर्ज मी २५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या निर्णयानुसार फेटाळला होता व परिवहन विभागास जागा मंजूरीचा आदेश सार्वजनिक प्रयोजनास्तव असल्याने कायम करण्यात आला. महसूल व वन विभागाकडून २५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या माझ्या निर्णयाची प्रत १० मार्च २०१६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी व अर्जदार संस्थेत पाठविण्यात आली होती. शासनाचा २७ एप्रिल २०१४ रोजीचा प्रशासकीय आदेश व २५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या पुनर्विलोकन अर्जावरील निर्णय अर्जदार संस्थेस मान्य नसल्यास त्यांनी त्याला उच्च न्यायालयात आव्हान देणे योग्य ठरले असते.

या प्रकरणातील अर्जदाराचे प्रकरण या पुर्वीच सन २०१२, २०१३ व २०१४ साली गुणवत्ता व कायदेशिर / नियमात बसत नसल्यामुळे फेटाळण्यात आले होते. ही बाब त्यांना कळविण्यात आली होती. तरीही त्यांनी वारंवार पाठपुरावा करणे व संबंधित जागेच्या किमतीचा धनादेश शासनास अगोदरच पाठविणे ही त्यांची भूमिका योग्य नाही. शिवाय शासनाला व क्षेत्रीय कार्यालयांना जाणीवपुर्वक त्रास देणे हेच एकमेव उद्दिष्ट अर्जदाराचे असल्याचे यावरुन दिसून येते.

*****